# व्ही. टी. पाटील यांचे शैक्षणिक कार्य आदर्शवत : डॉ. कळके

गारगोटी, २३ जानेवारी (प्रतिनिधी) : मौनी विद्यापीठासारख्या ग्रामीण भागात शिक्षणाचे कार्य करणाऱ्या संस्थेचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचविण्याचे महान कार्य संस्थापक रावसाहेब व्ही. टी. पाटील यांनी करून भुदरगड तालुक्यासारख्या मागास भागाचा सर्वांगीण शैक्षणिक विकास केला, असे उद्‌गार संस्थेचे संचालक डॉ. जयंत कळके यांनी रावसाहेब व्ही. टी. पाटील यांच्या सहाव्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित केलेल्या रक्तदान आणि प्रतिमा पूजन कार्यक्रमात बोलताना काढले. माजी आमदार आनंदराव देसाई प्रमुख पाहुणे होते. यावेळी ८२ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

यावेळी माजी आमदार आनंदराव देसाई यांनी आपल्या भाषणात व्ही. टी. पाटील यांच्या हृद्य आठवणी सांगितल्या. सुरुवातीला पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन माजी आमदार देसाई यांच्या हस्ते झाले. स्वागतगीत शाहू कुमारच्या विद्यार्थ्यांनी म्हटले. संजय मगदूम यांचेही यावेळी भाषण झाले. प्रा. शिवाजीराव चोरगे संचालक प्राचार्य सी. डी. चौगले, प्राचार्य शिवाजीराव बाबर, प्राचार्य डॉ. आनंद वास्कर, मुख्याध्यापक सर्वस्वी के. टी. कांबळे, एम. पी. कलकुटकी, जी. बी. खांडेकर, पी. एस. कांबळे, एम. बी. आणेकर, एस. के. कांबळे, एन. डी. नाझरे, सर्व शिक्षक विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थितीत होते. आभार के. टी. कांबळे यांनी मानले. सूत्रसंचालन टी. बी. पाटील यांनी केले.

कै. व्ही. टी. पाटील यांच्या स्मृतीदिनानिमित्त आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात ८२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यासाठी सी.पी.आर. हॉस्पिटल कोल्हापूर, गारगोटी ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. आर. डी. माने, त्यांचे सर्व सहकारी एन. सी. सी.चे छात्रसैनिक आयं. सी. आर.ई.चे प्राचार्य एस. जी. पाठक त्यांचे सर्व सहकारी यांचे सहकार्य लाभले.